पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.

क प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक- ९

स भा वृ तां त

दिनांक ६/३/२०१८ वेळ-दुपारी १२.०० वाजता

---------------------- ------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. “क” प्रभाग समिती मासिक सभा मंगळवार दि.६/३/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.अश्विनी संतोष जाधव सभापती
२) मा.सारीका शिवाजी सस्ते
३) मा.वसंत प्रभाकर बोराटे
४) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश
५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
७) मा.लांडे विक्रांत विलास
८) मा.गीता सुशिल मंचरकर
९) मा.राहुल हनुमंतराव भोसले
१०) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
११) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

याशिवाय मा.अण्णा बोदडे- क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.विशाल कांबळे-कार्यकारी अभियंता जलनिस्सारण, मा.प्रदीप मुथा- प्रशासन अधिकारी, मा.दवंडे- उपअभियंता पापु, मा.माने- उपअभियंता स्था, वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.बरीदे- उपअभियंता स्थापत्य,मा.पुसाळकर- उपअभियंता स्था., मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.वसंत उगले- लेखाधिकारी, मा.शेख-उपअभियंता विदयुत,श्रीमती दमयंती पवार,श्री.केदार- कनिष्ठ अभियंता विदयुत हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

----

उपस्थित सन्मा.सदस्य/सदस्या, अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- १) नामकरण संदर्भात - मा.राहुल भोसले,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- २) नामकरण संदर्भात- मा.राहुल भोसले,मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) नामकरण संदर्भात – मा.वैशाली घोडेकर,मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) टेल्कोरोड यशवंतनगर बौध्द विहाराच्या परिसराला बुध्दवासी शंकर चौधरी असे अधिकृत नांव देण्याबाबत-मा.वैशाली घोडेकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमकां- ५) नामकरण संदर्भात- मा.राहूल भोसले,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ६) नॉन डी पी रस्ता करुन मिळणेबाबत-मा.राहूल भोसले,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ७) प्रवेशद्वारास नामकरणास मंजुरी मिळणेबाबत- मा.राजेंद्र लांडगे,मा.वसंत बोराटे यांचा प्रस्ताव.

----

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा.वैशाली घोडेकर अनुमोदक-मा.गीता मंचरकर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माजी सदस्या डॉ.कमरुनिस्सा खान, श्री.बाबासाहेब धुमाळ यांचे तसेच ज्येष्ठ अभिनेत्री शम्मी उर्फ नर्गीस रबाडी, श्रीदेवी यांचे तसेच भगतवस्ती येथील ननंकुराम गौड यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------

मा.सभापती- श्रध्दांजली अर्पण करणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

-----

अ) दिनांक ६/२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १२/२/२०१८ रोजी झालेल्या विशेष सभेचा(कार्यपत्रिका क्रमांक ८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक- १

दिनांक-६/३/२०१८

सुचक-मा.राहुल भोसले अनुमोदक-मा.वैशाली घोडेकर

संदर्भ-मा.राहुल भोसले,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.९ नेहरुनगर येथील ईदगाह मैदान शेजारी बांधण्यात आलेल्या सभागृहास **"जहांगिरीया मैफिलखाना (गुरुमठ)"** असे नामकरण करणेत यावे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक- २

दिनांक-६/३/२०१८

सुचक-मा.राहुल भोसले अनुमोदक-मा.गीता मंचरकर

संदर्भ-मा.राहुल भोसले,मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.९ मधील उद्यमनगर आरक्षण सर्व्हे क्रमांक १०३ ( P) येथील उदयानास **"छबुताई शंकरराव मासुळकर उद्यान"** असे नामकरण करणेत यावे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक- ३

दिनांक-६/३/२०१८

सुचक-मा.वैशाली घोडेकर अनुमोदक-मा.गीता मंचरकर

संदर्भ-मा.वैशाली घोडेकर,मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.९ मधील नेहरुनगर मनपा दवाखान्यास **"माजी महापौर हनुमंतराव भोसले दवाखाना"** असे नामकरण करणेत यावे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक- ४

दिनांक-६/३/२०१८

सुचक-मा.वैशाली घोडेकर अनुमोदक-मा.राहूल भोसले

संदर्भ-मा.वैशाली घोडेकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

टेल्को रोड यशवंतनगर बौध्द विहाराच्या परिसरास बुध्दवासी शंकर चौधरी चौक म्हणुन ओळखले जाते.पण या चौकाची नोंद बुध्दवासी शंकर चौधरी असे अधिकृतपणे महापालिकेत नसल्याने ते लवकरात लवकर अधिकृत करुन घ्यावे व आपल्या महापालिकेच्या वतीने **"बुध्दवासी शंकर चौधरी"** या नावाचा त्या परिसरात फलक लावण्यात यावा. असे नामकरण करणेत यावे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक- ५

दिनांक-६/३/२०१८

सुचक-मा.राहूल भोसले अनुमोदक-मा.वैशाली घोडेकर

संदर्भ-मा.राहूल भोसले, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ९ मधील आरक्षण क्रमांक ८५ मासुळकर कॉलनी येथील रुग्णालयास “शंकर मासुळकर अर्बन हेल्थ सेंटर विथ आय (नेत्र) हॉस्पिटल ( Shankarrao Masulkar Urban Health With Eye Hospital ) असे नामकरण करणेत यावे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक – ३० विषय क्रमांक- ६

दिनांक-६/३/२०१८

सुचक-मा.राहूल भोसले अनुमोदक-मा.वैशाली घोडेकर

संदर्भ-मा.राहूल भोसले, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ९ मधील जीरो बॉईज चौक रिक्षा स्टँड, नाना नानी पार्क,झिरो बॉईज गणेश मंदीर ते A-1 सलून याठिकाणी वाढती रहदारी असल्याने व जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी नॉन डि पी ७ मीटर रस्ता करण्यात यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक – ३१ विषय क्रमांक- ७

दिनांक-६/३/२०१८

सुचक-मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक-मा.वसंत बोराटे

संदर्भ-मा.राजेंद्र लांडगे, मा.वसंत बोराटे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ६ मधील खालील तीन (३) ठिकाणी प्रवेशद्वार /कमान करणे आवश्यक आहे.

१) कै.किसनराव सखाराम लांडगे (भगत) प्रवेशद्वार
बाबा आनंद कार्यालयाकडे जाणारा रस्ता ( पुजा नर्सिंग होम समोर)

२) कै.किसनराव सखाराम लांडगे (भगत) प्रवेशद्वार
बाबा आनंद कार्यालय ते कै.किसनराव लांडगे मार्ग क्र.१

३) कै.किसनराव सखाराम लांडगे (भगत) प्रवेशद्वार
ओम नगरी ते भगतवस्ती (दत्तमंदिर समोर)

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर सर्वांचे आभार मानून मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/
(**अश्विनी संतोष जाधव** )
सभापती
क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – २६.
क्र-कक्षेका/कावि/१ २ /२०१८.
दिनांक ०८ /३/२०१८

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत-सर्व संबंधित विभाग
-------------------